**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY AFFILIATTED**

# RMD SINHGAD TECHNICAL INSTITUTE CAMPUS, WARJE, PUNE

## NATIONAL SERVICE SCHEME UNIT (A.Y. 2018-19)



शिबिरादरम्यान मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### आरएमडीच्या सेवा योजना शिबिराचे भुकूममध्ये आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगड इन्स्टिट्यूटच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत भुकूम गाव येथे श्रम संस्कार शिबिराचे आयोजन केले गेले. नवीन पिढीत विद्यार्थिदशेतच राष्ट्रसेवेचे व सामाजिक कार्याची जाणीव निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत वारजेतील आर.एम.डी. सिंहगड टेक्निकल इन्स्टिट्यूट कॅम्पस यांनी भुकूम गाव येथे सात दिवसांचे निवासी श्रम संस्कार शिबिर आयोजित करण्यात आले.

उमेश कृष्णा आंग्रे, सरपंच भुकूम, सीमा ननवरे, उपसरपंच, अनिल बोराटे, ग्रामसेवक, भुकूम व भारती खोपडे मुख्याध्यापिका, जि.प.. शाळा भुकूम आदी मान्यवरांच्या उपस्थितीत शिबिरास सुरुवात करण्यात आली. शिबिराअंतर्गत दैनिक श्रमसंस्कार सत्रे, विविध विषयांतील तज्ज्ञ मंडळींची व्याख्याने, जनजागृती फेरी, ग्रामस्वच्छता योगा सराव, शाळेतील विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने व संगणक प्रशिक्षण असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

शिबिर कालावधीत प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. दीक्षित, सहायक पोलीस निरीक्षक अनिल लवटे, डॉ. शरद मुळीक, उपसरपंच भूगाव दीपक करंजावने यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले व मार्गदर्शन केले.












श्रमसंस्कार शिबिरात साफसफाई करताना विद्यार्थी.

### राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर उत्साहात

**पुणे :** विद्यार्थ्यांना सामाजिक कार्याची आवड निर्माण होण्यासाठी राष्ट्रीय सेवा अंतर्गत आरएमडी सिंहगड टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या वतीने आयोजित श्रमसंस्कार शिबिर उत्साहात पार पडले. भुकुम (ता. मुळशी) गावात ४ ते १० जानेवारीदरम्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. श्रमसंस्कार शिबिरांतर्गत तज्ज्ञ मंडळींच्या व्याख्यानांद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले; तसेच ग्रामस्वच्छता, योगसराव, संगणक प्रशिक्षण, विविध ऐतिहासिक स्थळांना भेटी, वास्तुंच्या संवर्धनाबद्दल माहिती देण्यात आली. शिबिराला प्राचार्य व्ही. व्ही. दीक्षित, सहा. पोलिस निरीक्षक अनिल लवटे, डॉ. शरद मुळीक, दीपक करंजावणे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम अधिकारी ज्ञानेश्वर घुगे व सचिन वेळापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर पार पडले.










### भुकूमला सामाजिक विषयांबाबत जागृती

#### पुण्यातील सिंहगड इन्स्टिट्यूटच्या श्रमसंस्कार शिबिरात उपक्रम

**भुकूम, ता. १४ :** पुण्यातील सिंहगड इन्स्टिट्यूटच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत भुकूम (ता. मुळशी) येथे आयोजित केलेल्या श्रम संस्कार शिबिरातील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांतून विविध सामाजिक विषयांबाबत जनजागृती केली.



भुकूम (ता. मुळशी) : राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत श्रम संस्कार शिबिरात सहभागी झालेले पुण्यातील सिंहगड इन्स्टिट्यूटचे विद्यार्थी.

सिंहगड इन्स्टिट्यूटच्या वारजे येथील आर.एम.डी. सिंहगड टेक्निकल इन्स्टिट्यूट्स कॅम्पस आणि नऱ्हे येथील सिंहगड इन्स्टिट्यूट्स ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड सायन्स यांचे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सात दिवसांचे श्रमसंस्कार शिबिर नुकतेच भुकूम येथे झाले. या शिबिराचे उद्‌घाटन भुकूमचे सरपंच उमेश आंग्रे, उपसरपंच सीमा ननवरे, ग्रामसेविका अनिल बोराटे, मुख्याध्यापिका भारती खोपडे यांच्या उपस्थितीत झाले. या शिबिरात प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. दीक्षित, सहायक पोलिस निरीक्षक अनिल लवटे, डॉ. शरद मुळीक, भूगावचे माजी उपसरपंच दीपक करंजावणे यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण दिले. गावात श्रमदानातून स्वच्छता करण्यात आली. तसेच, सांस्कृतिक व प्रबोधन कार्यक्रमांतून विविध विषयांवर जनजागृती करण्यात आली. कार्यक्रम अधिकारी ज्ञानेश्वर घुगे व सचिन वेळापुरे यांनी शिबिराचे नियोजन केले.